# वारस

**इंद्रायणी सावकार**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**वारस**
इंद्रायणी सावकार


© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
इंद्रायणी सावकार
इ-१००१-५ मंत्री एलिगन्स,
एम. एस पाल्या, बेंगलोर ५६००७६
मो. नं. : ०९३२३८७४२२१, ०८०४१५७२९८१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ५८०/-

## आन्हिक

राजकारण हा या कादंबरीचा विषय नव्हे. 'पॉवर' हा विषय आहे. पॉवर सगळीकडे आहे आणि होती. ऑफिसात आहे, कुटुंबात आहे, राजकारणात आहे, समाजात आहे पॉवरची चटक लागते. पॉवर इच्छेनुसार देता घेता यावी अशा ऊर्मीने माणसं पछाडली जातात. पॉवरच्या हव्यासापायी कौटुंबिक आणि मानसिक सुखाचा अनेकदा विनाश होतो. पॉवरच्या ध्यासाचं हे चित्रण आहे. इथलं राजकारण निमित्तमात्र आहे.

१९६८ ते १९९१ काळाच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी घडते. कादंबरीतील सर्व पात्रे संपूर्णतया काल्पनिक आहेत, त्यांचा कोणत्याही जिवंत वा मृत व्यक्तीशी दूरत्वानेही संबंध नाही.

चर्चिलला एक अनौरस पुत्र होता. चर्चिलचे याच्यावरच प्रेम होते. हाच त्याचा राजकीय वारस झाला आणि पुढे इंग्लंडचा पंतप्रधान झाला. अँथनी ईडन हा चर्चिलचा अनौरस पुत्र असल्याची दाट वदंता होती. या प्रकरणामुळे चर्चिलच्या औरस मुलांना मनस्ताप झाला व चर्चिलच्या मुलीने आत्महत्या केली असे माझ्या वाचनात आले. त्यावरून कथानक सुचले.

लोकशाहीचे तात्त्विक स्वरूप अत्यंत विलोभनीय आहे; परंतु व्यवहारात ते किती बेगडी किंवा वेळप्रसंगी भीषणही ठरू शकते हा विचार या कथानकाच्या मागे आहे.

दुखण्याचा तपशील माझा पाठचा भाऊ हेमंत साठे याच्या दुखण्यावरून घेतला आहे. याची शस्त्रक्रिया अमेरिकेत यशस्वी झाली. साठ लाख रुपये खर्च आला.

**– इंद्रायणी सावकार**

# एक

१९६८. एप्रिल महिन्यातील पडती संध्याकाळ. मावळतीचा सूर्य बुधाईच्या टेकडीपलीकडून कलंडू लागला होता. टेकडीच्या पायथ्याशी हिरव्यागार रंगाचा एक विस्तीर्ण पट्टा होता. अत्यंत सुपीक पट्टा. ऊस, ज्वारी, तूर, मूग आणि मसूर यांची भरगच्च पिकं घेणारा हा शंभर एकरांचा पट्टा होता अण्णासाहेब बुधापूरकर पाटील यांचा. शिवाय बागाईत जमीन तेवढीच होती. आणखी अनेक लहानमोठ्या जमिनी होत्या. गावात शिरताना जिथं तिथं मखमली हिरवा रंग दिसत होता, अंगाला गारवा भासत होता, ते सर्व अप्पासाहेबांच्या मालकीचं होतं. तो ताजेपणा, निसर्गाचा आणि बुधाईचा तो वरदहस्त, हे अप्पासाहेबांच्या संपत्तीचं आणि सत्तेचं लेबल होतं.

आणि गावात याचा कोणालाही द्वेष नव्हता. अप्पासाहेबांच्या जमिनी अव्वल होत्या खऱ्या, पण अप्पासाहेब गावात होते, म्हणून इतरांच्याही जमिनी कसदार झाल्या होत्या. नाहीतर सारंच गाव दुष्काळाच्या खाईमध्ये लोपून जायचं.

एकाएकी त्या शांततेमध्ये भरधाव मोटारीचा आवाज घुमला.

''अप्पासाहेब आले.'' पोरंटोरं तर केव्हाच रस्त्यालगत अदबीनं उभी राहिली, पण इतरही अनेक धावली. त्या लाल दिव्याच्या गाडीला त्यांनी मुजरे केले.

''वाड्यावर जाऊन येतो जरा.'' अनेकांनी आपल्या घरात कळवलं. मोठ्या लोटानं माणसं वाड्याकडे निघाली. पंच आणि सरपंच, बाजारपेठ समितीचे अध्यक्ष, बँकेचे संचालक, काँग्रेस समितीचे सदस्य, स्वातंत्र्यसैनिक, नियोजित तेल गिरणीचे संचालक... पाच हजार लोकवस्तीचं ते गाव होतं. मेहनती आणि पैसेवाल्या लोकांचं ते गाव होतं. अप्पासाहेब त्यांचे आधारस्तंभ होते, प्रेमादराचे केंद्रबिंदू होते.

अप्पासाहेब गाडीतून उतरून पायऱ्या चढून आत जातात न जातात एवढ्यात सारा वाडा गजबजून गेलादेखील. दर्शनी व्हरांड्याच्या उजव्या बाजूला मान्यवरांची बैठकीची खोली होती. नोकरांनी भराभरा या खोलीचं दार उघडलं. मातब्बर मंडळी इथं जाऊन बसली. राजकारणाचा काथ्याकूट करू लागली. वाड्याच्या कुशीला एक हॉलवजा मोठी खोली होती. इथंही मोठ्या संख्येने लोक बसले. तरुण पोरं, शेतमजूर, किरकोळ लोक वाड्याबाहेर उभे राहिले. अप्पासाहेबांच्या दोन नोकरांनी पाण्याचे तांब्ये आणि फुलपात्रे दोनही खोल्यांत ठेवली. स्वयंपाकघरात भल्यामोठ्या पातेल्यात चहाचं आधण उकळू लागलं.

अप्पासाहेब घरात गेले. वय साठीच्या नजदीक चाललं होतं. हातपाय बारीक होते. पोट सुटलं नव्हतं, पण मोठंच होतं जरा. चेहरा भरदार, पण थकल्यासारखा होता. तोकडी मिशी राखली होती. डोळ्यांवर सोनेरी काडीचा चष्मा होता. केस पिकले होते पण दात चांगले भक्कम होते. साहेब हसले की अत्यंत सोज्वळ, मायाळू, दिलदार वाटत, पण वाक्वचितच हसत. त्यांच्या विस्तृत कपाळावर चिंतेच्या आणि संतापाच्या रेषांनी कायमचं ठाण मांडलं होतं.

व्हरांड्यालगत दिवाणखाना. अप्पासाहेबांची एकुलती एक मुलगी तिथं उभी होती. सतरा वर्षांची विलक्षण गोरी, सुंदर, टेरिकॉटची गुलाबी रंगाची साडी नेसली होती. मॅचिंग ब्लाऊज होता. किंचित लाजून खाली मान घालून उभी होती. अप्पासाहेब माजघरात येताच पुढे झाली. वाकून तिनं अप्पासाहेबांच्या पायांना दोन्ही हात लावले. मग डोक्यावरून पदर घेऊन ती शालीनपणे जवळ उभी राहिली.

''बऱ्या आहात नं? मंजुळा?'' अप्पासाहेबांनी तिचा डावा खांदा हलकेच थोपटला. तिला पाहताच त्यांच्या मनातले सगळे विचार बाजूला सरकले होते. तिथं प्रेम उचंबळू लागलं होतं. मंजुळेचं बरं केलं पाहिजे, तिला चांगला नवरा शोधला पाहिजे. हे एकच त्यांचं मूल होतं.

मंजुळेनं होकारार्थी मान हलवली.

''आई आहे आत?''

''आहे.''

या पडत्या संध्याकाळी, गावात किंवा जवळपास कार्यक्रम नसताना कमळाबाई जाणार तरी कुठे? पण काहीतरी विचारायचं म्हणून अप्पासाहेबांनी विचारलं होतं. माजघराच्या पुढे एक खोली होती. तिथं जेवायचं टेबल होतं. उजवीकडे अप्पासाहेबांची खोली होती. कमळाबाई तिथंच होत्या. पलंगाला चिकटून उभ्या होत्या. अप्पासाहेबांची दुसरी पत्नी. मंजुळाची आई. मंजुळा आईसारखीच सुंदर झाली होती. अप्पासाहेबांची पहिली बायको निपुत्रिक वारल्यानंतर कमळाबाईंशी दुसरा विवाह केला होता. तिलाही एकच मूल झालं होतं – मंजुळा. पण अप्पासाहेब नाखूश नव्हते.

कमळाबाई वयानं चाळीसपेक्षाही जरा कमी. अंगानं किरकोळच. हँडलूमची जरीच्या काठपदराची साडी नेसल्या होत्या. अप्पासाहेब आत येताच त्यांनी वाकून नमस्कार केला. मग डोक्यावरून पदर घेऊन त्या उभ्या राहिल्या.

''मी लगेच मटण आणते. आंघोळ करणार की आराम?''

''काहीच नाही. संपतराव पोहोचले का? त्यांना बोलावून घ्या. एकाच वेळी ते कोल्हापुरातून निघाले, मी पुण्यावरनं निघालो. येऊन पोहोचले असले पाहिजेत. आणि मटणही नको मला. माझ्यासाठी भाजी सांगा.''

''का बरं?'' कमळाबाई एकदम भयभीत झाल्या. त्यांच्या आणि अप्पासाहेबांच्या वयात वीस वर्षांपेक्षा जास्त अंतर असल्यामुळे त्यांच्या प्रकृतीची त्यांना नेहमी चिंता असे.

''कंटाळलोय जरा. बाकीची खातील.''

कमळाबाई भाजी सांगण्यासाठी खोलीबाहेर पडल्या.

अप्पासाहेब घाईत उठून उभे राहिले, पण तेवढ्या गडबडीनंही त्यांच्या छातीत जरा घाबरल्यासारखं झालं. ते खाली बसले. छाती चोळून जरा सावकाशीनं उठले. व्हरांड्याच्या डावीकडे त्यांची खाशा बैठकीची खोली होती, तिकडे गेले.

संपतराव नुकतेच फाटकातून आत शिरले होते. पायऱ्या चढत होते. खादीच्या कापडाचा आणि करड्या रंगाचा सूट त्यांनी घातला होता. शर्टही खादीचाच होता; पण टाय नव्हता. पायात पठाणी वहाणा होत्या. त्यांची चाळिशी नुकतीच उलटली होती. सर्वसामान्य लोकांपेक्षा ते किंचित उंच होते. सावळे व ताठ होते. केस बारीक कापलेले. डोळ्यांवर अद्याप चष्मा नव्हता. चेहरा अती गंभीर. विद्वत्तेमुळे जास्त पोक्त दिसत होते.

अप्पासाहेबांप्रमाणेच संपतरावांनीही क्रांतिकार्यात भाग घेतला होता. खादीचं व्रत घेतलं होतं. छोटासा तुरुंगवासही भोगला होता. परंतु नंतर ते पुन्हा कॉलेजात परत गेले होते. अर्थशास्त्र घेऊन त्यांनी एम. ए. केलं होतं. गावात एवढे उच्चशिक्षित तेच एकटे होते. अप्पासाहेबांना याचं खूप कौतुक होतं. एम. ए. नंतर संपतराव जेव्हा प्राध्यापकाची नोकरी शोधू लागले तेव्हा अप्पासाहेबांनी त्यांना परावृत्त केलं.

''संपतराव! गावचं सुलक्षण आहात तुम्ही. तुमच्यासारख्यानं जेवढं म्हणून शिकता येईल तेवढं शिकलं पाहिजे. मास्तरकी करायला आहेत बरेच. आणखी काही शिकण्याजोगं नाही का तुम्हाला?'' त्यांनी विचारलं.

संपतराव भारावले.

''लंडनला स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये जाऊन शिकायची माझी इच्छा आहे; पण ते फारच महागडं काम आहे.''

''तुम्ही जायची तयारी करा. पैशाचं मी बघतो.''

अप्पासाहेबांनी गावातून फंड काढला होता, स्वत:चे दहा हजार रुपये दिले होते. दोन वर्षांत तिथली पदवी घेऊन संपतराव परत आले होते. अप्पासाहेबांनी त्यांना अनेक सरकारी समित्यांवर नेमलं होतं. अनेक कारखान्यांचे – विशेषत: साखर कारखान्यांचे ते सल्लागार होते आणि अप्पासाहेबांचे व्यक्तिगत सल्लागार, दोस्त आणि हितचिंतक होते.

अप्पासाहेबांचं राजकारण हेच संपतरावांचं स्वत:चं जीवन होतं. त्यांनी नोकरी केली नव्हती आणि लग्नही केलं नव्हतं. त्यांच्या समित्या आणि राजकारणावरची त्यांची भाषणं, लेख आणि चर्चा हेच त्यांचे आवडीचे विषय होते.

वयात अंतर असलं तरी दोन्ही मित्रांचं एकमेकांवर अतूट प्रेम होतं. एका गावी असले तर दिवसाकाठी पाचसहादा तरी दोघांच्या भेटी व्हायच्या. बाहेरगावी असले तरी फोन करून बोलणं व्हायचं. एकमेकांना पाहताच दोघांच्याही मुद्रा विलक्षण प्रसन्न झाल्या.

दोघंही बोलता बोलता खाशा बैठकीमध्ये शिरले. समाजातील आणि आसपासच्या सर्व प्रमुख घराण्यांची त्यांना खडा न् खडा माहिती होती. ते राजकारणात होते. तेल्याचा तेलाशी संबंध, हलवायाचा मिठाईशी, तसा त्यांचा लोकांशी येत होता. लोकांची मनं जिंकणं हा त्यांचा धंदा होता. मने जिंकली की मतं सहज जिंकता येत होती.

''डॉक्टरांचे रिपोर्ट आले का?'' खाशा खोलीतल्या सोफा सेटवर बसताच संपतरावांनी चिंतेच्या स्वरात विचारलं.

अप्पासाहेबांनी मान डोलावली.

''रिपोर्ट फारच भयंकर आहेत. एक लहान ॲटॅक येऊन गेला असं डॉक्टरांचं म्हणणं आहे.''

संपतराव विलक्षण चिंतित झाले. अप्पासाहेबांचं जीवन हेच त्यांचं जीवन होतं. आज ना उद्या अप्पासाहेब मुख्यमंत्री होतील, अशी त्यांची हार्दिक अपेक्षा होती.

''घाबरण्याचं काही कारण नाही अप्पासाहेब! चांगली औषधं निघालीत आता.'' संपतराव म्हणाले. हा स्वत:चं समाधान करण्याच प्रयत्न होता.

''औषधं दिली आहेत. मटण सोडायला सांगितलंय. तेलतूप बंद केलंय; पण घरात मी काहीही बोललो नाही.''

''बरं केलंत. वैनींना काळजी कशाला? रिपोर्ट कुठे आहेत?''

''बबनकडे आहेत.''

''ही बातमी कोणालाही कळली नाही पाहिजे.''

''म्हणून तर पुण्याचा डॉक्टर गाठला. बबनलाही बजावलंय. तोंड बंद ठेव म्हटलंय.''

''प्रकृती सांभाळा. मुख्यमंत्री व्हायचं आहे तुम्हाला.''

''सांभाळतोच आहे. डॉक्टरांनी बायकाही बंद केल्या माझ्या!'' अप्पासाहेबांच्या सुरात वैतागाची छटा आली. त्यांना स्त्रीसहवासाची दांडगी आवड होती. संपतराव स्वत: अविवाहित असले तरी त्यांच्यापासून स्वत:ची ही आवड अप्पासाहेबांनी लपवून ठेवली नव्हती.

''ते रास्तच आहे. हार्ट ॲटॅक आणि बायका यांचा घनिष्ट संबंध आहे.''

''म्हातारपण आलं संपतराव! याचा सरळ सरळ अर्थ हाच आहे. साठीला आलो तरी तरणाबांड राहिलो म्हणून गर्व होता मला; पण डॉक्टरांनी फटका मारला. जाऊ द्या. मंजुळेचं तेवढं बघा मेलो समजा तर. कमळाचे माहेरचे लोक तिला सांभाळतील; पण

मंजुळेत जीव अडकेल माझा! मुख्यमंत्रिपदापेक्षा तिच्यात जीव अडकलेला आहे माझा. तिच्या लग्नाचं पाहा.''

''बघतो. सतरा वर्षांची आहे. एखादं वर्ष गेलं म्हणून काही बिघडत नाही असं वाटून थांबलो होतो; पण आता तोही प्रोजेक्ट हाती घेतो.''

''मंजुळा जन्मभर सुखात राहिली पाहिजे. हे एवढं वैभव मी कमावलंय ते सगळं तिचंच आहे. मला पैशांची अपेक्षा नाही. तिच्यावरून जीव ओवाळून टाकणारा जावई मला पाहिजे.''

''उद्याच्या उद्याच तलाश सुरू करतो. मागण्या सारख्या येताहेत, पण मीच मनावर घेतलं नव्हतं. आता घेतो. माहिती काढतो एकेकाची.''

अप्पासाहेबांनी आनंदाने मान डोलावली. ते आता निश्चिंत झाले होते. सोफ्याच्या कोपऱ्यात त्यांनी मान टेकली आणि डोळे मिटले. या एवढ्या बोलण्यानेही त्यांना धाप लागली होती.

संपतरावांच्या मनात कोंडून पडलेली सारी चिंता त्यांच्या चेहऱ्यावर धावून आली. अप्पासाहेबांचा धपापणारा ऊर त्यांना ठीक वाटला नाही. अप्पासाहेबांना वर्षा बंगल्यात स्थानापन्न करायचं हे त्यांचं सगळ्यात आवडतं स्वप्न होतं. तसं करण्याची वेळ येऊन ठेपली नव्हती. वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. इंदिरा गांधी पंतप्रधान दोन वर्षांपूर्वी झाल्या होत्या. यशवंतराव चव्हाण संरक्षणमंत्री होते. महाराष्ट्र निवांत होता. पण स्वप्नांना काळवेळ, योग्यायोग्यता माहीत नसते. संपतरावांच्या स्वप्नाचंही तसंच होतं. त्यांचं जीवन अप्पासाहेबांनी घडवलं होतं. कुठल्यातरी कॉलेजात ते प्राध्यापकाची नोकरी करत रखडत राहिले असते. अप्पासाहेबांनी त्यांना या सामान्य जीवनातून ओढून काढलं होतं. फॉरीन-रिटर्न्ड केलं होतं. तज्ज्ञ बनवलं होतं. बहुमानाची जिंदगी दिली होती. या उपकाराची परतफेड करणं हेच संपतरावांचं आता ध्येय होतं. फेड करायची म्हणजे अप्पासाहेबांना मुख्यमंत्री करायचं.

## दोन

संपतरावांची मोटारसायकल औतेगावाच्या रस्त्याला लागली होती. एक नेमकी योजना मनात साकार झाली होती. औतेगाव येण्याआधीच औतेगावचा प्रियदर्शिनी सहकारी साखर कारखाना संपतरावांच्या वाटेत आडवा आला. सर्व अर्थांनी हा कारखाना त्यांच्या मार्गात आडवा आलेला होता. बुधापूरला साखर कारखाना मिळावा म्हणून गेली काही वर्षे अप्पासाहेबांनी अक्षरश: जिवाचं रान केलं होतं. बुधापूरच्या नियोजित जवाहर सहकारी कारखान्याचे चीफ प्रमोटर संपतरावच होते.

अप्पासाहेब महाराष्ट्रातले महत्त्वाचे मंत्री असल्यामुळे कारखाना त्यांनाच मिळणार अशी अप्पासाहेबांसहित साऱ्या गावकऱ्यांची खात्री झाली होती. स्वत: संपतरावांच्या

मनश्चक्षूंसमोर तर कारखाना पहिला अर्ज भरल्यापासूनच साकार झाला होता. त्यांनी अनेक जागा पाहिल्या होत्या. एक घेऊन ठेवली होती, यंत्रसामग्रीची ऑर्डर देण्याच्या ते गोष्टी करू लागले होते.

पण कारखाना शेवटी औतेगावालाच मिळाला होता. गेनबा जमदाडे पाटील प्रियदर्शिनी कारखान्याचे अध्यक्ष होते. कारखान्यासाठी ते प्राण पणाला लावून लढले होते.

त्यांचं म्हणणं, ''सगळंच अप्पासाहेबांना का म्हणून मिळावं? मंत्रिपदही त्यांनाच. त्यामुळे रस्ते, पाणी, वीज, पूल आणखी जे काही असेल ते त्या सगळ्यांचा पाऊस बुधापूरवरच पडतोय. आता तेवढा कारखाना तरी औतेगावच्या पदरात टाका. आमच्याकडे ऊस आहे, नदी आहे, माणसं आहेत, जिद्द आहे. औतेगावानं असं काय केलंय की आम्हाला नेहमीच नन्नाचा पाढा ऐकावा लागावा? नेहमीच सावत्रपणाची वागणूक मिळावी? आम्हीही क्रांतिकार्य केलंच की, आमच्याही पोरांना नोकऱ्या हव्यात. आम्हालाही सुबत्ता हवी.'' आणि कुठं तरी गेनबांनी पकडलेला हा सूर वरिष्ठांना पटला होता. एक दिवस 'प्रियदर्शिनी' च्या नावाचं लेटर ऑफ इंटेंट घेऊन गेनबा मुंबईहून परतले होते. औतगावकरांनी पुरा एक आठवडा जल्लोष केला होता. पत्राची पालखीतून मिरवणूक काढली होती.

पेढ्यांचा पहिला पुडा त्यांनी पत्राच्या प्रतीसह बुधापूरच्या सरपंचांकडे पाठवून दिला होता.

आता गेनबांचा कारखाना बांधून पूर्ण झाला होता. या वर्षी त्यांनी गळिताचा हंगामही घेतला होता. आता हंगाम संपला होता. त्या प्रचंड मोठ्या यंत्रसामग्रीच्या सफाईचं काम चाललं होतं. तो कारखाना पाहताच आजही संपतरावांच्या काळजात भाला भोसकल्यासारखी कळ उमटत होती. गेनबाचं पुरं खानदान मोटारीतून इतस्ततः धावत होतं. संपतरावांच्या नशिबाची मोटारसायकल मात्र सुटत नव्हती.

हा कडवटपणा संपतरावांपुरताच मर्यादित होता. त्यांनीही मनात गाडून टाकला होता. कारखाना मिळविण्यासाठी चार वर्षं दोन्ही गावात तुंबळ धुमश्चक्री माजली होती. एकमेकांना खिजवणं, टोमणे मारणं, भांडणं उकरणं आणि क्वचित प्रसंगी हातघाईवर येणं – सगळे प्रकार सुरू होते.

पण आता वैर मिटलं होतं. बुधापूरची पोरं 'प्रियदर्शिनी'मध्ये नोकरीवर लागली होती. बुधापूरचा ऊस प्रियदर्शिनीला विकला गेला होता. औतेगावकरांच्या लग्नात बुधापूरची लेझीमपथकं नाचू लागली होती. याचाच फायदा संपतराव उचलणार होते.

संपतरावांनी कारखान्याच्या फाटकाशी मोटार थांबवली. आत गेले. गेनबांची शुभ्र पांढरी अँबॅसॅडर गाडी कारखान्याच्या भिंतीलगत उभी केलेली होती. इथं दुसऱ्या कोणाचीही गाडी लावण्यास कडक बंदी होती.